# महेश अर्बन को-ऑप. बँक लि., सोलापूर.

(फक्त सभासदांसाठी )

## वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

महेश अर्बन को-ऑप. बँक लि., सोलापूर या संस्थेची सन २०२४-२५ ची (२९ वी ) वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार दि. १३/०९/२०२५ रोजी दुपारी ४.०० वाजता **माहेश्वरी सांस्कृतीक भवन,** १७६/४, भवानी पेठ, सोलापूर येथे खालील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी बोलाविली आहे. तरी सदर सभेस सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित राहावे, ही विनंती.

### * सभेपुढील विषय *

१) मागील दि. १७.०८.२०२४ रोजीचा वार्षिक सर्वसाधारण सभेचा वृतांत वाचून कायम करणे.

२) सन २०२४-२०२५ चा स्टॅटुटरी ऑडीटेड ताळेबंद व नफा-तोटा पत्रक, हिशोब पत्रक व वार्षिक अहवाल वाचून स्विकृत करणे.

३) नफा वाटणी व लाभांश संचालक मंडळाच्या शिफारशी नुसार मंजूर करणे.

४) सन २०२५-२०२६ चे संचालक मंडळाने तयार केलेले खर्च व उत्पन्नाचे अंदाजपत्रक मंजूर करणे व सन २०२४-२५ चे अंदाजपत्रकापेक्षा जादा झालेल्या खर्चास मान्यता देणे.

५) सन २०२४-२०२५ च्या लेखापरीक्षण व दोष दुरुस्ती अहवालाची माहिती व नोंद घेणे.

६) सन २०२५-२०२६ करिता संचालक मंडळानी शिफारस केलेल्या वैधानिक लेखापरीक्षकाची नेमणूक करणे बाबत.

७) सन २०२५-२०२६ करिता संचालक मंडळानी शिफारस केलेल्या कंकरंट ऑडीरची नेमणूक करणे बाबत.

८) बँकेचे संचालक व त्यांचे नातेवाईकांच्या कर्जाची माहिती घेणे.

९) सन २०२५-२६ सालाकरिता बाहेरील कर्ज मर्यादा ठरविणे.

१०) वार्षिक लेखापरीक्षण अहवाल इंग्रजीत करुन मिळणेबाबत.

११) पोटनियम दुरुस्तीस मान्यता देणेबाबत.

१२) कर्ज वसुलीचा हक्क कायम ठेऊन लेखापरीक्षक यांनी प्रमाणित केलेली कर्जे निर्लेखित करणे बाबत.

१३) वार्षिक सर्वसाधारण सभेस अनुपस्थित असणाऱ्या सभासदांची अनुपस्थिती क्षमापित करणे.

संचालक मंडळाच्या हुकुमावरून
सही- संतोष देवरगुडी
मुख्य कार्यकारी अधिकारी

सोलापूर
दि. : २६/०८/२०२५

**सूचना :** १) पुरेशा गणपूर्ती अभावी सभा तहकूब झाल्यास ती सभा त्याच दिवशी ठरलेल्या वेळेपेक्षा अर्ध्या तासानंतर त्याच ठिकाणी घेतली जाईल. त्या सभेस पुरेशा गणपूर्तीची आवश्यकता राहणार नाही.

२) सन २०२४-२०२५चा ऑडीटेड ताळेबंद व नफा-तोटा पत्रक, अंदाजपत्रक, अहवाल हे बँकेच्या नोटीस बोर्डावर सर्व सभासदांच्या माहितीस्तव उपलब्ध करून ठेवला आहे. तसेच **website: https://maheshbanksolapur.in** वर उपलब्ध आहे.

३) ताळेबंद व नफा-तोटा पत्रकासंबंधी सभेत काही माहिती किंवा स्पष्टीकरण विचारावयाचे असल्यास सभासदांनी दि ०५/०९/२०२५ च्या आत बँकेच्या वेळेत मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे लेखी कळविल्यास माहिती देता येईल. त्यानंतर आलेल्या प्रश्नांचा विचार केला जाणार नाही.

- ज्या सभासदांनी अद्याप लाभांश नेलेला नाही त्या सभासदांनी बँकेतून घेऊन जावे. अन्यथा बँकेच्या पोटनियमाप्रमाणे जाहीर केलेल्या लाभांश (डिव्हिडंड) तारेखेपासून तीन वर्षानंतर रिझर्व फंडात लाभांस जमा केले जाते.
- सभासदांनी शेअर्सबाबत व त्यांचा ठेवी बाबत नॉमिनी ( वारस ) नोंद केली नसल्यास बँकेत लेखी नोंद करावी.
- सभासदांनी शेअर्ससर्टीफीकेटस् नेले नसल्यास मुख्य कार्यालयातून घेवून जावेत.
- के.वाय.सी. बाबत :- सभासदांनी आधारकार्ड, पॅन कार्ड, पत्याचा पुरावा (वीज बिल, टॅक्स पावती, टेलिफोन बिलाची झेरॉक्स), फोटो बँकेत दिलेले नसल्यास ते आणून द्यावेत. त्याशिवाय लाभांश (डिव्हिडंड) मिळणार नाही याची नोंद घ्यावी, ही विनंती.